दैनिक

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

# महावृत्त

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990









लातूर वर्ष ४ थे अंक २५३ वा गुरूवार दि.०३ एप्रिल २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# ‘फोडा आणि राज्य करा’ भाजपचे धोरण; लोकसभेत विरोधकांची टीका

नवी दिल्ली : वृत्तसंस्था लोकसभेत बुधवारी (२ एप्रिल) वक्फ मालमत्तांच्या प्रशासनात सुधारणा करण्याच्या उद्देशाने मांडलेल्या वक्फ (सुधारणा) विधेयक २०२५ वर सरकार आणि विरोधकांमध्ये जोरदार सामना रंगला. हे विधेयक सकाळी चर्चेसाठी आणि मंजुरीसाठी घेतले गेले. भाजप सरकारचे फोडा आणि राज्य करा, असे धोरण असल्याची टीका विरोधकांनी केली. केंद्रीय मंत्री अमित शहा आणि किरेन रिजिजू यांनी विधेयकाचे समर्थन केले, तर विरोधी पक्षांतील समाजवादी पक्षाचे अध्यक्ष, खासदार अखिलेश यादव आणि काँग्रेसचे खासदार गौरव गोगोई यांनी या विधेयकाला तीव्र विरोध दर्शवला. काँग्रेसचे खासदार गौरव गोगोई म्हणाले, अल्पसंख्याकांना बदनाम व अधिकारहिन करण्याचा हा प्रयत्न म्हणजे संविधानावर हल्ला आहे. सरकार धर्मात हस्तक्षेप का करत आहे? संविधान कमकुवत करणे, अल्पसंख्याकांना बदनाम करणे, त्यांचे अधिकार काढून घेणे आणि भारतीय समाजात फूट पाडणे, हाच भाजपचा हेतू आहे. अल्पसंख्याक व्यवहार मंत्रालयाने २०२३ मध्ये संसदीय समितीच्या चार बैठकांमध्ये या विधेयकाचा उल्लेख केला नव्हता, पण अचानक त्यावर दुरुस्ती सादर केली. भाजप निवडणूक प्रक्रिया कमकुवत करून धार्मिक सलोखा नष्ट करू इच्छित आहे. भाजपशासित राज्यांमध्ये मुसलमानांना ईदच्या नमाजासाठी परवानगी दिली नाही. वक्फ दुरुस्तीच्या नावाखाली अल्पसंख्याकांना टार्गेट करण्याचा सरकारचा डाव आहे. गेल्या वर्षी वक्फ कायद्याच्या दुरुस्तीवर पुनरावलोकन करण्यासाठी नेमलेल्या संयुक्त संसदीय समितीच्या कामकाजावरही त्यांनी जोरदार टीका केली. समितीत तरतुदींच्या मुद्द्यांवर चर्चा झाल्याच नाहीत आणि विरोधकांच्या सूचना



धुडकावण्यात आल्या. वक्फ बोर्डाशी काहीही संबंध नसलेल्या लोकांना बोलावून त्यांची मते विचारण्यात आली, असेही ते म्हणाले.

सरकारला कोणता संदेश द्यायचा आहे? जो समाज १८५७ मध्ये मंगल पांडेसोबत लढला, ज्या समुदायाने भारताच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान दिले, त्या समुदायाची प्रतिमा डागाळण्याचा हा प्रयत्न आहे. हे तुमचे फोडा आणि राज्य करा धोरण आहे. आमच्यासाठी राष्ट्रवाद म्हणजेच एकता, असेही गोगोई म्हणाले. तृणमूल काँग्रेसचे खासदार कल्याण बॅनर्जी जे वक्फचे सदस्य आहेत, त्यांनीही विधेयकाला विरोध दर्शविला.

## वक्फ बोर्ड विधेयकाबाबत ‘उबाठा’ गटाची दुटप्पी भूमिका

मुंबई : प्रतिनिधी निवडणुकीत मुस्लिम मतांसाठी राजकारण करणा-यांचे खरे चेहरे आज वक्फ बोर्ड सुधारणा विधेयकाच्या निमित्ताने समोर आले, अशी खरमरीत टीका शिवसेनेचे मुख्य नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उबाठावर केली. बाळासाहेबांचे विचार सोडून राहुल गांधी यांच्या सांगण्यानुसार वागणा-या उबाठाची दुटप्पी भूमिका दिसली, असे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले. राज्य सरकारच्या १०० दिवसांच्या कृति आढावा बैठकीनंतर ते पत्रकारांशी बोलत होते.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, सोयीचे राजकारण करणारे लोक वक्फ बोर्ड विधेयकाचा हिंदुत्वाशी संबंध नाही, असे जेव्हा बोलतात तेव्हा त्यांच्या भूमिकेवर संशय निर्माण होतो. आता ते बाळासाहेबांचे विचार घेऊन पुढे जातात की राहुल गांधी सांगतात ते करतात, हे पाहावे लागेल, असे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले.



वक्फ बोर्ड सुधारणा विधेयकासंदर्भात शिवसेनेने यापूर्वीच स्पष्ट आणि सडेतोड भूमिका घेतली आहे. आम्ही कधीही मतांसाठी सोयीचे राजकारण केले नाही. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे यांच्या विचारांसोबत आम्ही पुढे जात आहोत. आम्ही सत्तेसाठी विचारांशी कधीही तडजोड केली नाही, असे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले. काही मूठभर लोकांच्या हातात वक्फ बोर्डाची मालमत्ता ठेवण्यापेक्षा गरीब मुसलमानांसाठी शाळा, रुग्णालये झाली पाहिजेत. हे विधेयक मुस्लिम समाजाच्या हिताचे आहे, असे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले. या विधेयकामुळे मुस्लिम समाजाचा सर्वांगीण विकासाचा मार्ग खुला होईल. या विधेयकाचे मुस्लिम समाजानेही स्वागत करायला हवे. हे राज्य छत्रपती शिवाजी महाराजांच्या आदर्शाने चालते. पंतप्रधान नरेंद्र मोदी देखील छत्रपतींच्या आदर्शावर देशाचे नेतृत्व करत आहेत. इथे औरंगजेबाचे उदात्तीकरण करणा-या लोकांना थारा नाही, असे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले. १०० दिवसांत ८५ टक्के कामे पूर्ण करणार महायुती सरकारने १०० दिवसांचा कृति आराखडा तयार केला आहे. २६ विभागांचा आज आढावा घेत असताना अधिका-यांनी आणि मंत्र्यांनी ही संकल्पना गांभीर्याने घेतल्याचे दिसले. यातील ६० टक्के कामे पूर्ण झाली असून २५ टक्के कामे प्रगतिपथावर आहेत. १०० दिवसांत ८५ टक्के कामे पूर्ण होतील, अशी माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बैठकीनंतर माध्यमांना दिली. १०० दिवसांतील कामांना गती मिळाली आणि संकल्पनेनुसार अधिकारी वर्गाने काम केले. प्रत्येक विभागाची कार्यक्षमता यातून दिसली. मागील अडीच वर्षात महायुती सरकारने जे काम केले त्याच वेगाने आता काम होईल, आता महाराष्ट्र थांबणार नाही, तो दुप्पट-चौपट वेगाने पुढे जाणार, असा विश्वास उपमुख्यमंत्री शिंदे यांनी व्यक्त केला.

## *कु. वेदीका मेहर (एमबीबीएस) परिक्षेत चांगल्या गुणांनी उत्तीर्ण रिपब्लिकन सेना नवी मुंबई जिल्हाध्यक्ष : विरेंद्र लगाडे यांनी केले अभिनंदन

नवी मुंबई / के. एच. हनवते :- सर्वांना आनंदाची बातमी सारसोळेगांव ग्रामस्थ नेरूळ नवी मुंबई येथील आपल्या बहुजन समाजातील मुलगी कुमारी : वेदिका नीलकंठ (सुवर्णा) मेहर ही या वर्षाच्या (एमबीबीएस) परीक्षेमध्ये चांगल्या गुणांनी पहिल्याच प्रयत्नांमध्ये चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाली आहे. सारसोळे गाव या ग्रामीण भागामध्ये आमचे मित्र नीलकंठ मेहर हे (एमएसईबी) मधून सेवानिवृत्त झाले आहेत व त्यांची कन्या वेदिका हिला त्यांनी पूर्णपणे शिक्षणासाठी सहकार्य केले आहे आणि वेदिका ने सुद्धा कुठल्याही प्रकारचा फार मोठा सपोर्ट नसताना सुद्धा स्वतःच्या मेहनतीने दिवस-रात्र अभ्यास करून आज ती डॉक्टर झाली आहे तिचे (एमबीबीएस) चे संपूर्ण शिक्षण हे गव्हर्नमेंट नायर हॉस्पिटल व मेडिकल कॉलेज मुंबई या मधून झाले आहे सारसोळे गावातील मेहर कुटुंब एक आदर्श असे कुटुंब आहे त्यांचा



मोठा मुलगा रिद्धेश हा सुद्धा इंजिनियर व एमबीए झालेला आहे ग्रामीण भागामध्ये राहून सुद्धा मेहर कुटुंब यांनी आपल्या मुलांना चांगल्या प्रकारचे संस्कार व चांगल्या प्रकारचे शिक्षण दिले आहे आणि सारसोळे या गावांमधून (एमबीबीएस) डॉक्टर होण्याचा पहिला मान हा डॉ. वेदिकाच्या माध्यमातून मेहेर कुटुंबीयांनी पटकावला आहे त्याबद्दल मेहर कुटुंबाचे हार्दिक अभिनंदन व कुमारी डॉक्टर - वेदिका हिला सुद्धा पुढील तिच्या सामाजिक कार्यास खूप खूप शुभेच्छा व तिने घवघवीत यश संपादन केले त्याबद्दल रिपब्लिकन सेना नवी मुंबई जिल्हाध्यक्ष विरेंद्र लगाडे यांनी मनापासून अभिनंदन केले.

## लालू प्रसाद यादव यांची तब्येत बिघडली

पाटणा : वृत्तसंस्था राष्ट्रीय जनता दलाचे प्रमुख व बिहारचे माजी मुख्यमंत्री लालू प्रसाद यादव यांची प्रकृती बिघडल्याने त्यांना आज रुग्णालयात दाखल करण्यात आले. दुपारी ४.०५ वाजता एअर इंडियाच्या विमानाने ते दिल्ली जाणार होते. यापूर्वी त्यांची प्रकृती बिघडल्याने त्यांना पारस रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. दरम्यान, आज रात्री उशिरा त्यांना एअर ॲम्ब्युलन्सने दिल्लीतील एम्स येथे नेले जाण्याची शक्यता आहे.



आज सकाळपासून लालू यादव यांची प्रकृती बिघडली. त्यांना तत्काळ पाटणा येथील पारस रुग्णालयात दाखल करण्यात आले. लालू यादव यांच्यासोबत त्यांचा मुलगा तेजस्वी यादव आणि कुटुंबातील इतर सदस्य आहेत. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार त्यांना उपचारांसाठी दिल्लीला नेण्याची तयारी सुरू आहे. लालू यादव यांची अलीकडेच तब्येत सुधारली होती. पण, त्यांची प्रकृती पुन्हा बिघडली आहे. दरम्यान, आज रात्री उशिरा त्यांना एअर ॲम्ब्युलन्सने दिल्लीतील एम्स येथे नेले जाण्याची शक्यता आहे.

## रेणा कारखाना नुतन संचालकां कडून जिल्हा बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांची भेट.

### नुतन संचालक मंडळास पुढील वाटचालीसाठी धिरज देशमुख यांनी दिल्या शुभेच्छा.

लातूर:-- साखर उद्योगात अल्पावधीतच नावारूपाला आलेल्या रेणा सहकारी साखर कारखान्याची निवडणूक जाहीर झाली होती. यामध्ये सहकार महर्षी दिलीपरावजी देशमुख साहेब, माजी मंत्री आ. अमित विलासराव देशमुख व जिल्हा बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली सदरील निवडणूक बिनविरोध पार पडली. नुतन संचालक मंडळातील सदस्यांनी दि. २ एप्रिल २०२५ रोजी बाभळगाव येथे जिल्हा बँकेचे अध्यक्ष तथा रेणा कारखाना नुतन संचालक श्री धिरज विलासराव देशमुख यांची भेट घेतली. मतदारांनी जो विश्वास संचालक मंडळावर दाखवला तो सार्थ ठरवत असताना सर्वांना सोबत घेवून शेतकरी हिताची वाटचाल करण्यासाठी नुतन संचालक मंडळ कटीबद्ध असून यासाठी सर्व संचालक मंडळास धिरज विलासराव देशमुख यांनी पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी माजी आमदार त्र्यंबक भिसे,यशवंतराव पाटील, सर्जे



राव मोरे, अनंतराव देशमुख, संग्राम माटेकर, धनराज देशमुख, गोविंद पाटील, सतिश पाटील, शंकरराव पाटील, तुकाराम कोल्हे, रणजित पाटील, बालाजी हाके यांच्यासह रेणापूर तालूका काँग्रेस पदाधिकारी आदींची उपस्थिती होती.

## मधील लिव्ह इन रिलेशनशिपबाबतच्या अनेक तरतूदींना आव्हान, डझनभरापेक्षाही जास्त याचिका दाखल

नैनीताल - समान नागरी संहिता म्हणजे यूसीसी कायद्यातील तरतुदींना त्याच्या घटनात्मकतेसह आव्हान देणाऱ्या याचिकांवर उच्च न्यायालयाने राज्य सरकारला ४८ तासांच्या आत उत्तर दाखल करण्याचे निर्देश दिले. न्यायालयाने सर्व याचिकांसाठी पुढील सुनावणीची तारीख २२ एप्रिल निश्चित केली. मुख्य न्यायाधीश जी नरेंद्रन आणि न्यायमूर्ती आलोक मेहरा यांच्या खंडपीठासमोर यूसीसीला आव्हान देणाऱ्या अर्धा डझनहून अधिक याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. सुरेश सिंग नेगी यांनी मुस्लिम, पारशी इत्यादींच्या वैवाहिक व्यवस्थेकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप करत यूसीसीमध्ये लिव्ह-इन रिलेशनशिपच्या तरतुदीला आव्हान दिले आहे. याचिकेत असे म्हटले आहे की, सामान्य विवाहासाठी मुलाचे वय २१ वर्षे आणि मुलीचे वय १८ वर्षे असले पाहिजे, परंतु लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये दोघांचेही वय १८ वर्षे निश्चित करण्यात आले आहे. अशा नात्यातून जन्माला येणाऱ्या मुलांना कायदेशीर म्हटले जाईल किंवा बेकायदेशीर मानले जाईल, असा त्यांचा सवाल आहे. असा आरोपही करण्यात आला आहे की जर एखाद्या व्यक्तीला त्याच्या लिव्ह इन रिलेशनशिपमधून मुक्तता मिळवायची असेल, तर तो रजिस्ट्रारकडे एक साधा अर्ज सादर करून सुमारे १५ दिवसांच्या आत त्याच्या जोडीदाराला सोडू शकतो. याउलट लग्नात मात्र घटस्फोट घेण्यासाठी संपूर्ण न्यायालयीन प्रक्रिया पार पाडावी लागते आणि घटस्फोट अनेक दशकांनंतर होतो, तोही पूर्ण भरणपोषण देऊन. राज्य सरकारने संविधानाने नागरिकांना दिलेल्या अधिकारांचे उल्लंघन केल्याचा आरोपही याचिकेत करण्यात आला. यूसीसी लागू झाल्यानंतर, लोक लग्न करण्याऐवजी लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहणेच पसंत करतील. जोपर्यंत जोडीदाराशी संबंध चांगले आहेत तोपर्यंत मी राहीन, अन्यथा मी निघून जाईन. २०१० नंतर विवाह नोंदणी करणे अनिवार्य करण्यात आली आहे. जर असे केले नाही तर तीन महिने शिक्षा किंवा १० हजार दंड होऊ शकतो याकडेही त्यांनी लक्ष वेधले आहे. अन्य एका याचिकेत एल्मासुद्दीन सिद्दीकी यांनी अल्पसंख्याकांच्या चालीरीतींकडे दुर्लक्ष केल्याचा उल्लेख केला आहे. इतर याचिकांमध्ये असे म्हटले आहे की इस्लामिक रीतिरिवाज आणि कुराण आणि त्याच्या इतर तरतुदींकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे. कुराणातील आयतींनुसार, पतीच्या मृत्यूनंतर, पत्नीने त्याच्या आत्म्याच्या शांतीसाठी ४० दिवस प्रार्थना करावी, तर यूसीसी ते करण्यास मनाई करते. शरियतनुसार, इस्लाममध्ये रक्ताच्या नात्याव्यतिरिक्त इतर लोकांशी लग्न करण्याची तरतूद आहे, यूसीसीमध्ये हे मान्य नाही.



## गोरक्षण संस्थेच्या विकासासाठी सर्वतोपरी सहकार्य करू : आ. संजय बनसोडे

उदगीर / प्रतिनिधि :- उदगीर शहरालगत असलेल्या सोमनाथपुर येथील गोरक्षण संस्थेच्या पदाधिकाऱ्यांकडून होत असलेले गोसेवेचे कार्य हे महान कार्य असून या संस्थेच्या विकासासाठी आपण सर्वतोपरी सहकार्य करू अशी ग्वाही माजी मंत्री आ. संजय बनसोडे यांनी दिली. सोमनाथपुर येथील श्री गोरक्षण संस्था परिसरात गोमातेसाठी नव्याने उभारण्यात आलेल्या निवारा शेडचा गोअर्पण सोहळा व नविन विकासकामांचा शुभारंभ माजी मंत्री आ. संजय बनसोडे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आ. गोविंदराव केंद्रे होते. यावेळी व्यासपीठावर राष्ट्रवादी काँग्रेस ( शरद पवार गट) प्रदेश सरचिटणीस बस्वराज पाटील नागराळकर, माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटूरे, भाजपाचे शहराध्यक्ष मनोज पुदाले, ज्येष्ठ समाजसेवक रमेश अंबरखाने, सोमनाथपुरच्या सरपंच अंबिका पवार, माजी पंचायत समिती सदस्य विदेश पाटील, माजी नगरसेवक ॲड. दत्ताजी पाटील, अनिल मुदाळे, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे शहराध्यक्ष सय्यद जानी, प्रा. शाम डावळे, उद्योजक सागर महाजन, पशुधन विकास अधिकारी घोनसिकर, ज्येष्ठ कार्यकर्ते शिवयोगी तोंडारे, डॉ. रामप्रसाद लखोटीया, प्रशांत मांगुळकर आदींची उपस्थिती होती. यावेळी बोलताना माजी मंत्री आ. संजय बनसोडे म्हणाले की,






देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गोमातेच्या बाबतीत कायदा केला आहे, त्या कायद्याची सर्वांनी अंमलबजावणी करावी असे आवाहन करून गोरक्षण संस्थेच्या परिसरात आणखी एक निवारा शेड उभे करण्यासाठी दोन कोटी रुपयांचा निधी आपण मागच्या काळात दिला आहे. या पुढील काळात या संस्थेच्या विकासासाठी आणखी वाढीव निधी आपण देऊ असे आश्वासनही यावेळी आ. बनसोडे यांनी दिले. यावेळी गोसेवेसाठी योगदान दिल्याबद्दल समाजातील काही मान्यवरांचा माजी मंत्री आ. बनसोडे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नरसिंग कंदले यांनी केले. सूत्रसंचालन नरसिंग कंदले व विक्रम हलकीकर यांनी केले. आभार मोतीलाल डोईजोडे यांनी मानले.

## संपादकीय....

# तेलंगणात काँग्रेसचे ओबीसी कार्ड

तेलंगणात बहुसंख्येने असणार्या ओबीसींची आरक्षण मर्यादा ४२ टक्के करण्याचा निर्णय घेत काँग्रेसच्या रेवंथ रेड्डी सरकारने भारतीय जनता पक्ष आणि भारत राष्ट्र समिती या दोन्ही पक्षांना कोंडीत पकडण्याचा प्रयत्न चालवला आहे. केंद्र सरकारच्या मंजुरीशिवाय हे आरक्षण लागू करता येणार नसले, तरी येत्या काळात या संवेदनशील प्रश्नावर राजकारण तापेल. मराठा आरक्षणाची कोंडी फोडण्यासाठी महाराष्ट्रासाठी हा मोठा धडा ठरू शकतो.

ओबीसी आरक्षण आणि जातनिहाय जनगणनेच्या मुद्द्यावर भारतीय जनता पक्षाला आव्हान देण्याच्या हेतूने तेलंगणातील काँग्रेसच्या रेवंथ रेड्डी सरकारने ओबीसींचे आरक्षण २३ वरून ४२ टक्के करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय बहुमताने घेतला. आरक्षणाचा हा विषय अपेक्षेप्रमाणे चर्चेपासून दूर ठेवला गेला असला, तरी त्याचे पडसाद येत्या काळात देशभर उमटण्याची शक्यता आहे. केंद्राकडे जातनिहाय जनगणनेची मागणी करणार्या काँग्रेसने ओबीसी आरक्षणाच्या प्रयोगासाठी तेलंगणाची निवड करून या प्रश्नावरील राजकारणाला हात घातला. त्यामुळे राज्याच्या ओबीसी राजकारणाला नव्याने उकळी फुटली. भाजपला दक्षिणेत रोखण्याचे आणि या राज्यात बहुजन राजकारणाचा दावा करणार्या भारत राष्ट्र समितीला कोंडीत पकडण्यासाठी हे राजकारण सुरू आहे. पन्नास टक्क्यांची मर्यादा ओलांडणारे हे आरक्षण घटनेच्या चौकटीत बसणारे नाही, हे स्पष्ट आहे. अर्थातच, ते माहिती असतानाही हा निर्णय घेतला गेला. येत्या काळात राष्ट्रीय पातळीवर हा मुद्दा आणण्याची काँग्रेसची रणनीती दिसते. आरक्षणाची मर्यादा वाढवताना रेड्डी सरकारने निर्णयाला मजबूत सामाजिक आकडेवारीचा शास्त्रीय आधार दिला. गेल्या वर्षी जातनिहाय सर्वेक्षण घेतले. त्यातून ओबीसींचे प्रमाण राज्यात ५६.३६ टक्के असल्याचे स्पष्ट झाले. हा निष्कर्ष साधार मानून आरक्षणाचा निर्णय घेतला गेला. २०२३ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला मिळालेल्या स्पष्ट बहुमतामागे हेच महत्त्वाचे कारण होते. काँग्रेसने ओबीसी आरक्षण मर्यादा वाढवण्याची घोषणा केली होती; मात्र निर्णयास विलंब झाल्याने लोकसभा निवडणुकीत पक्षाला मोठा फटका बसला.

राज्यातील १७ पैकी ९ जागा मिळवत भारत राष्ट्र समितीने आघाडी घेतली, तर भारतीय जनता पक्ष तीन जागा मिळवत दुसर्या क्रमांकावर राहिला. सत्ता असूनही काँग्रेसला केवळ दोन जागांवर समाधान मानावे लागले. पराभवाला उत्तर म्हणून केवळ अस्तित्वासाठी ओबीसी आरक्षणाचा डाव काँग्रेसने मांडल्याचे दिसते. राज्यातील ५६.३६ टक्के ओबीसी जनतेला केवळ २३ टक्केआरक्षण आहे. मर्यादा वाढवत ते ४२ टक्के केल्याने आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक दृष्ट्या उपेक्षित समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहात येण्याची मोठी संधी मिळणार आहे.भारतीय जनता पक्षाला दक्षिणेच्या राजकारणात प्रवेश करण्याला आजही अपेक्षित यश मिळालेले नाही, हे वास्तव आहे. कर्नाटकचा अपवाद वगळता कोणत्याही राष्ट्रीय वा स्थानिक मुद्द्यावर पक्षाला येथे स्वत:चा जनाधार तयार करता आलेला नाही. साहजिकच विधानसभा निवडणुकीत केवळ आठ जागांवर समाधान मानावे लागले. अर्थात, दक्षिणेकडील राज्यांची प्रभावी ठरलेली प्रादेशिक मानसिकता, हिंदीला विरोध आणि त्यानिमित्ताने हिंदी भाषिक राजकारणालाच विरोध हे सूत्र केवळ तेलंगणातच नव्हे, तर तामिळनाडूतही प्रादेशिक पक्षांनी ठेवले आहे. भारतीय जनता पक्षाला त्याचा मोठा फटका बसताना दिसतो. स्वातंत्र्योत्तर काळात सक्रिय आणि सर्वसमावेशक राजकारणामुळे काँग्रेसने दक्षिणी राजकारण करत सरकारे चालवली. भाजपला अजूनही मोठी कसरत करावी लागत आहे.


पक्षाच्या मतदान टक्केवारीचा आलेख चढता असला, तरी भारत राष्ट्र समिती, काँग्रेस आणि एमआयएमने फार मोठा अवकाश शिल्लक ठेवलेला नाही. ओबीसींच्या मुद्द्यावर राष्ट्रीय राजकारणात आणि विशेषत: विधानसभा निवडणुकांतून मोठे यश मिळवणार्या भाजपला येथे मात्र जनतेने फारसे जवळ केले नाही. आज ना उद्या भारतीय जनता पक्ष या व्होट बँकेत शिरकाव करणार, हे लक्षात घेऊन काँग्रेसने सावधपणे पावले टाकली आहेत. पन्नास टक्क्यांची आरक्षण मर्यादा ओलांडण्याचे धाडस रेवंथ रेड्डी सरकारने केले, ते लोकसभा निवडणुकीत डाव अंगलट आल्यानेच. हा विषय आता केंद्राच्या कोर्टात असला, तरी भारतीय जनता पक्षाला धड त्याला मान्यता देता येत नाही, ना त्याला विरोध करता येतो. झालाच तर त्याचा मोठा फायदा काँग्रेसलाच होऊ शकतो. विशेष म्हणजे, स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीतही या आरक्षण धोरणाचा राजकीय लाभ उठवण्याच्या तयारीत काँग्रेस आहे. राष्ट्रीय पातळीवरच ओबीसी आरक्षणाचा हा फॉर्म्युला लागू करायचा आहे, असा दावा काँग्रेस करते. जातनिहाय जनगणनेची मागणी रेटण्यामागे तेच एक महत्त्वाचे कारण आहे. ही अडचण लक्षात घेऊन भारतीय जनता पक्ष या मुद्द्यावर टोलवाटोलवी करत असल्याचा आरोप होतो.

गेल्या चौदा वर्षांपासून जनगणनेचा विषय अधांतरी ठेवण्यात आला आहे. या सामाजिक असमतोलाचा आणि सामाजिक त्रुटीचा राजकीय फायदा काँग्रेस, भारत राष्ट्र समितीसारखे पक्ष उठवताना दिसतात. खरा मुद्दा आहे तो लोकसंख्येच्या प्रमाणात मागासवर्गीयांना त्यांचे खरे प्रतिनिधित्व मिळवून देण्याचा. त्यासाठी राजकीय इच्छाशक्तीचा अभाव दिसतो. तेलंगणात सत्तेवर असल्याने काँग्रेसने निर्णय घेतला आणि तो पूर्ण करूनही दाखवला. आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा या निर्णयामुळे ओलांडल्याने केंद्र सरकार आणि सर्वोच्च न्यायालय या दोहोंच्या निर्णयावर त्याचे भवितव्य अवलंबून आहे. तामिळनाडूनंतर या राज्यानेही ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडली असून ते आता ६३ टक्के झाले आहे. त्याची अंमलबजावणी झालीच, तर मागासवर्गीयांना शिक्षण, रोजगार आणि निवडणुकीत ४२ टक्के प्रतिनिधित्व देण्याची तरतूद यात आहे. विशेष म्हणजे, या राज्यात १२.५६ टक्के मुस्लिम लोकसंख्या सर्वेक्षणात आढळली.

त्यापैकी दहा टक्के लोक मागासवर्गीय आहेत. याचा अर्थ या अल्पसंख्य समाजातही मागासवर्गीयांचे प्रमाण वेगाने घटताना हा वर्ग वेगाने मुख्य प्रवाहात येताना दिसतो. या राज्यात 'एमआयएम'ला अपेक्षित यश न मिळण्यामागे हे महत्त्वाचे कारण असावे. राष्ट्रीय राजकारणाच्या परिप्रेक्ष्यात ओबीसी आरक्षण आणि जातनिहाय जनगणना हा काँग्रेस आणि भाजपच्या राजकीय रणनीतीचा भाग आहे. तेलंगणापुरता विचार करायचा, तर घटनेची चौकट मोडत काँग्रेसने ही कोंडी फोडली खरी; पण आरक्षणाचा पुढचा मार्ग खडतर आहे. बिहार विधानसभेच्या आगामी निवडणुकीत ओबीसी आरक्षणावरून वातावरण तापले, तर नवल नाही.

# बहिष्कृत भारतातील पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर.

पत्रकारिता हा परिवर्तनवादी चळवळीचा जिव्हाळ्याचा विषय आहे. विचारांची देवाणघेवाण, आदानप्रदान होण्यासाठी प्रिंट, इलेक्ट्रॉनिक, ऑनलाईन, ऑफलाईन प्रचार प्रसार माध्यमांची नितांत आवश्यकता असते. ज्यामुळे जनतेचे जनमत संघटीत केले जाते. ज्या विचारांच्या बाजूने जनमत संघटीत होऊ शकेल त्या विचारांचे अर्थात त्या विचारांच्या प्रतिनिधित्व करणा-या पुढा-यांच्या नेतृत्वाखाली राज्य अस्तित्वात आणले जाऊन संचलन केले जाते. अशा परिस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक जीवनात पदार्पण करताना आपली समस्यात्मक बाजू व्यवस्थेसमोर मांडण्यासाठी त्यांना वृत्तपत्राची निकड भासली म्हणून ३१ जानेवारी १९२० ला त्यांनी मूकनायक या वृत्तपत्राची सुरूवात केली होती. तेव्हा समाजात केवळ हजारात नऊ लोक शिकले सवरलेले, साक्षर होते, तरी त्यांनी यांच्या मार्फत इतरांना संदेश दिला जावा म्हणून पाक्षिकाची सुरुवात केली होती. ५ जुलै १९२० ला त्यांना पुढील शिक्षणासाठी इंग्लंडला जावे लागले. तेव्हा त्यांनी ज्ञानदेव घोलप यांचेकडे कारभार सोपविला होता. तोपर्यंत १२ अंक प्रकाशित झाले होते. १३ व्या अंकापासून वृत्तपत्राची अर्थव्यवस्था ढासळत गेली परिणामी ते पाक्षिक दीर्घ काळ चालू शकले नाही.




पुढे ही उणीव भरून काढण्यासाठी पुनश्च हरि : ॐ! पासून सुरूवात करून बहिष्कृतांच्या समस्या प्रवाहात आणण्यासाठी रविवार, दिनांक ३ एप्रिल १९२७ ला बहिष्कृत भारत नावाचे पाक्षिक सुरू केले. ज्यामुळे बहिष्कृत भारत या पाक्षिकाच्या आगमनाने महाराष्ट्रातील हिंदू समाजात एक प्रकारचे तुफान आले. या पाक्षिकाचा पहिला अंक जरी रविवारी प्रकाशित झाला असला तरी पुढील सर्व अंक शुक्रवारी प्रकाशित करण्यात आले आहेत. या पाक्षिकाची वार्षिक वर्गणी ३ (तीन) रुपये तर किरकोळ अंकाचे मूल्य दीड आणा होते. हे पाक्षिक पुढे दोन वर्षे चालले. त्यामार्फत चळवळीतील अनेक समस्यांवर वेळोवेळी लिखाण करण्यात आले आहे. बहिष्कृत भारतातील पहिल्या अंकात पुनश्च हरि : ॐ या शीर्षकाचा दीर्घ अग्रलेख लिहिण्यात आला असून त्यात तत्कालीन बहिष्कृत समाजाची स्थिती अधोरेखित करण्यात आली आहे. यात मूकनायक ची पार्श्वभूमी स्पष्ट करून हिंदू समाज व्यवस्थेत बहिष्कृत समाजावर होणा-या अन्याय अत्याचाराचे विवेचन करीत असताना त्यांच्यात अंतर्भूत असणारी क्रमिक असमानतेवर आधारित जातीव्यवस्था अर्थात हिंदू समाज हा एक मनोरा असून त्यात प्रत्येक जात ही एका मजल्याप्रमाणे होती. त्या मनो-यातील कुठल्याही मजल्यावरील व्यक्तीला एका मजल्यावरून दुसऱ्या मजल्यावर जाण्यासाठी शिडी नसल्याने ज्यांनी ज्या मजल्यावर जन्मावे, त्यांनी त्याच मजल्यावर मरावे. अशी विदारक परिस्थिती होती. खालच्या मजल्यातील व्यक्ती कितीही लायक असला तरी वरच्या मजल्यावर त्याला प्रवेश नव्हता तर वरच्या मजल्यावरील व्यक्तीला तो कितीही नालायक असला तरी त्याला खाली लोटून देण्याची कुणाची हिंमत होत नव्हती. तशी कुणाला धर्मशास्त्राने परवानगीच नाकारली होती. यात गुणावगुणांचा विचार केला जात नसल्याने उच्च जातीत जन्मलेल्या नीच प्रवृत्तीच्या माणसाला उच्च समझले जात असे तर खालच्या जातीत जन्मलेल्या सद्गुणी व्यक्तीला सुद्धा नीच समझले जात होते. धर्माने परस्परांशी रोटी बेटी व्यवहार नाकारल्याने मानवीय मैत्री भाव विकसित होत नव्हते परिणामी जिव्हाळा संपुष्टात आलेला असायचा त्यामुळे यांच्यात ब्राह्मण, ब्राह्मणेतर व बहिष्कृत असे समाजाचे तीन अविभाज्य भाग निर्माण झाले. यात बहिष्कृतांच्या स्पर्शाला सुद्धा विटाळ मानला जात असे.

सत्ता व ज्ञानाअभावी ब्राह्मणेत्तरांची प्रगती खुंटली परंतु शेती, व्यापार, व्यवसाय करण्याची मुभा असल्याने चरितार्थ चालविण्यापूरती मिळकत करता येत होती. बहिष्कृतांना मात्र ती संधी सुद्धा नाकारण्यात आल्याने त्यांच्यात दौर्बल्य, दारिद्र्य व अज्ञान या त्रिवेणी संगमाच्या विळख्यात त्यांना गुंतून पडावे लागले. यातून मुक्तता मिळविण्यासाठी त्यांच्या समस्या वेशीवर टांगण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना बहिष्कृत भारत या पाक्षिकाची पुनश्च सुरूवात करावी लागली होती. बहिष्कृत भारतातील अग्रलेख हे महाराष्ट्रातील तेजस्वी परंपरेत बसणारे, विचारप्रवर्तक व बहिष्कृत समाजाच्या समस्यांचे सविस्तर विश्लेषण करणारे निबंधच होते. त्यातील तर्कशुद्ध खंडण-मंडण, युक्तिवाद, डौलदार व आवेश पूर्ण विनयशील भाषाशैली, समर्पक सुभाषिते, अवतरणे यांनी परिपूर्ण असे ते भरीव लिखाण होते.



बहिष्कृत भारतातील पहिला अग्रलेख पुनश्च हरि : ॐ या शीर्षकाखाली आहे. मात्र दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या अंकातील अग्रलेख हे मात्र महाड सत्याग्रहात कुणाची काय भूमिका असावी? याचे दिशानिर्देश करण्यासाठी लिहिलेले आहेत. महाड येथील धर्मसंगर आणि वरिष्ठ हिंदूंची जबाबदारी., महाड येथील धर्मसंगर व इंग्रज सरकारची जबाबदारी. व महाड येथील धर्मसंगर व अस्पृश्य वर्गाची जबाबदारी. यातून एखाद्या समस्येला निर्माण करण्यात अग्रेसर असणारे घटक म्हणजे हिंदू, तत्कालीन परीस्थितीत जनतेवर राज्य करणारे घटक म्हणजे इंग्रज, ब्रिटिश सरकार व समस्यांचे दुष्परिणाम भोगणारा अस्पृश्य वर्ग यांना दिशानिर्देश करून सजग करण्यासाठी लिहिलेल्या अग्रलेखातून समस्यांचे निराकरणासाठी संबंधित विषयाकडे बघण्याचा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा प्रगल्भ व्यापक दृष्टिकोन लक्षात येतो. करिता लिहिल्या गेलेल्या अग्रलेखाच्या लेखमाला या समस्या निर्मूलनासाठी केलेल्या प्रयत्नांचे दस्तावेज आहेत. ज्यातून बहुउद्देशीय दृष्टीकोनातून विषयाच्या विविध बाजू विचारार्थ घेऊन केलेली मांडणी ही त्यांची व्यापक प्रज्ञा किती उच्च कोटींची होती? हे लक्षात येते. यात त्यांनी व्यवस्थेला अर्थात सरकारला कायदेशीर सरकारी भाषेत, तर हिंदू धर्म मार्तंडाना त्यांच्या हिंदू धर्मातील सिद्धांताचा व तत्वांचा आधार देऊन आणि जे समस्याग्रस्त आहेत त्यांना याची जाणीव करून देताना त्यांची काय जबाबदारी व भूमिका असावी? हेच स्पष्ट केले आहे. हे करीत असताना त्यांच्यातील तेज, सत्व व विवेकाला आव्हान दिले आहे. अर्थात एकाच समस्येवर व्यक्त होताना कायदा, प्रमाण आणि भावना या त्रिवेणी संगमाचा शहाणपणाने वापर केलेला आहे.

महाड सत्याग्रहात कोणत्याही ब्राह्मण जातीतील गृहस्थास चवदार तळ्यातील सत्याग्रहात सामील करण्यात येऊ नये. अशी ब्राह्मणेतरांचे पुढारी जेधे व जवळकरांनी घेतली होती. याचा स्पष्ट शब्दात इन्कार करताना बाबासाहेब म्हणाले होते की, आम्ही ब्राह्मणांच्या विरोधात नाही ही गोष्ट आम्ही जाहीर करू इच्छितो, आमचा कटाक्ष ब्राह्मण्यावर आहे. ब्राह्मण लोक आमचे वैरी नसून ब्राह्मण्यग्रस्त लोक आमचे वैरी आहेत. असे आम्ही समझतो. या भावनेने प्रेरित झाल्यामुळे ब्राह्मण्यग्रस्त ब्राह्मणेतर हा आम्हाला दूरचा वाटतो व ब्राह्मण्यरहीत ब्राह्मण आम्हास जवळचा वाटतो. हे विवेचन आपण तटस्थ आणि विवेकशील वृत्तीने समजावून घेतले पाहिजे. जेणेकरून ज्यांना आपण आपले समझतो त्यांच्यातील ब्राह्मण्यग्रस्त प्रवृत्तीचा नायनाट करता येईल.

या समाजातील अपवादात्मक सोडून आर्थिक दृष्ट्या गर्भश्रीमंत, संपन्न माणसे सुद्धा वैचारीक दृष्टीने दरिद्रीच राहिले आहेत. म्हणून त्यांनी प्रचार प्रसार माध्यमांना हवी ती किंमत दिलेली नाही. परिणामी त्यांना स्वत:ची प्रचार प्रसार माध्यमे निर्माण करून चालविता आलेली नाहीत. त्यामुळे जीवनाच्या विविध क्षेत्रात समाजाची दुरावस्था झालेली आहे. अनेक प्रस्थापितांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारितेचा उल्लेख करणे टाळले असले तरी डॉ. व्ही. डी. राव यांनी द इंडियन प्रेस मधील द बिगिनिंग एंड ग्रोथ ऑफ दि मराठी प्रेस मध्ये दखल घेतली आहे. अमेरिकन विदुषी डॉ. एलिनॉर झेलियट यांनी त्यांच्या डॉ. आंबेडकर आणि महार चळवळ यात वृत्तपत्रीय लेखनाची ऐतिहासिक नोंद घेतली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बहिष्कृत भारत या पाक्षिकात आजकालचे प्रश्न, आमची जखम, अग्रलेख, आत्मपरिचय, लोकहितवादीची पत्रे, प्रासंगिक विचार, सुबोध वचने, वाचकांचा पत्रव्यवहार, विचारविनिमय, वर्तमानसार, पोच व अभिप्राय, बहिष्कृत भारत पुरवणी इत्यादी सदर प्रसंगानुरूप चालविले जात होते. तरी सध्या या सर्व ऐतिहासिक विचारांचा मागोवा घेताना वर्तमान प्रासंगिकता लक्षात घेऊन आदर्श महापुरुषांच्या सुविचारांचे फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल वर्धापनदिनानिमित्त वैचारीक प्रबोधनात्मक कार्यशाळेचे आयोजन करीत असते. तरी परिवर्तनवादी प्रसार माध्यमांनी कार्यशाळा नावांचे सदर चालवून बातम्यांना प्राधान्याने प्रकाशित करावे. जेणेकरून वर्तमानात आदर्श महापुरुषांच्या विचारांचा अग्नी प्रज्वलित ठेवता येईल. आपण सर्वांना बहिष्कृत भारत या पाक्षिकाच्या वर्धापनदिनानिमित्त कोटी कोटी सदिच्छा व्यक्त करतो.

*********


लेखक : बी. बी. मेश्राम (संचालक : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल, नॅशनल कौन्सिल मेंबर ऑफ दि ऑल इंडिया नाग असोसिएशन : आईना)
संपर्क : ९४२१६७८६२८

# एक महान अर्थतज्ञ...

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर भारतीय संविधानाचे शिल्पकार समाजक्रांतिकारक आणि वंचितांच्या कल्याणाचा वसा घेतलेले राजकारणी म्हणून जगभर लौकिक आहे,मानववंशशास्त्र,सामाजिक शास्त्रं,राज्यशास्त्र असे कोणतेही विषय त्यांच्या प्रज्ञेच्या कक्षेतून सुटले नाहीत. पण त्यांच्या उपलब्ध सर्व लेखनातून, भाषणांतून, इतर साहित्यातून एक गोष्ट प्रकर्षानं जाणवते. ती म्हणजे, त्यांच्या बुध्दीच्या आणी हृदयाच्या सर्वात जवळ असणारा विषय होता अर्थशास्त्र.अर्थशास्त्रज्ञ म्हूणन डॉ. आंबेडकरांनी केलेलं काम हे कायम त्यांच्या घटनानिर्मितीच्या वा जातव्यवस्था निर्मूलनाच्या,त्यासाठी केलेल्या राजकारणाच्या नंतर आलेलं आहे. पण आंबेडकरांचे अर्थविचार हे अनेक त्यांच्या कार्यरत असण्याच्या अनेक दशकांवर विस्तारले आहेत. अगदी विद्यार्थीदशेपासून.आणि त्या अर्थविचारांनी भारतीय अर्थव्यवस्थेला दिशा दिलेली आहे.

डॉ.आंबेडकर हे अर्थशास्त्र विषयात उच्चशिक्षण घेतलेल्या सुरुवातीच्या भारतीयांपैकी एक होते.त्यांनी १९१७ मध्ये कोलंबिया विद्यापीठातून अर्थशास्त्रात एम.ए. व पीएच.डी.केली आणि नंतर लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड पॉलिटिकल सायन्सने त्यांना १९२३ मध्ये अर्थशास्त्रात डी.एस्सी.पदवी प्रदान केली.त्यांनी अर्थशास्त्रज्ञ म्हणून त्यांच्या ज्ञानाचा उपयोग त्यावेळी भारतात प्रचलित असलेल्या सामाजिक समस्यांचा अभ्यास करण्यासाठी व त्यावरील उपाय सुचविण्यासाठी केला. त्यांनी 'ईस्ट इंडिया कंपनीचे प्रशासन व वित्त' या विषयावरील पहिला अर्थशास्त्रीय प्रबंध एम.ए.या पदवीसाठी अमेरिकेच्या कोलंबिया विद्यापीठाला १५ मे १९१५ रोजी सादर केला होता.त्यांचा दुसरा अर्थशास्त्रीय प्रबंध 'ब्रिटिश भारतातील प्रांतीय वित्ताची उत्क्रांती' हा १९१७ मध्ये त्यांनी पूर्ण केला (तो नंतर १९२५ मध्ये ब्रिटनमधून प्रकाशित झाला).

'रुपयाची समस्या : त्याचा उगम व त्याचे उपाय' हा तिसरा अर्थशास्त्रीय प्रबंध त्यांनी लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड पॉलिटिकल सायन्समध्ये 'डॉक्टर ऑफ सायन्स' या अत्युच्च पदवीसाठी १९२२ मध्ये सादर केला व डिसेंबर १९२३ मध्ये ब्रिटनमधून प्रकाशित झाला.बाबासाहेबांची अर्थव्यवस्थेची व वित्तीय व्यवस्थांची समज त्यांनी लिहिलेल्या 'द प्रॉब्लेम ऑफ रुपी : इटस् ओरिजिन अँड सोल्युशन' या त्यांच्या ग्रंथातून स्पष्ट होते. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाची स्थापना करताना विचारात घेतलेल्या हिल्टन यंग कमिशनसमोर त्यांनी युक्तिवादही मांडले.त्या काळात गोल्ड स्टँडर्डविरुद्ध गोल्ड एक्स्चेंज स्टँडर्डवरील वादविवाद जोरात सुरू होते.त्यांनी त्या काळातील सर्वात प्रमुख अर्थशास्त्रज्ञ जॉन मेनार्ड केन्स यांच्या सिद्धांतांना विरोध केला.त्यांनी सुधारित सुवर्ण मानकांच्या बाजूने युक्तिवाद केला,तर केन्स हे सुवर्ण विनिमय मानकांचे समर्थक होते. बाबासाहेबांचा मूळ युक्तिवाद असा होता की,सुवर्ण मानकाने भारतासारख्या विकसनशील देशासाठी चलनात एकप्रकारची स्थिरता प्रदान केली होती आणि पैशाचा पुरवठा सोन्याशी जोडण्याच्या कल्पनेच्या विरोधात होता.गरिबांच्या फायद्यासाठी त्यांनी विनिमय दराच्या स्थिरतेपेक्षा किंमत स्थिरतेच्या महत्त्वावर जोर दिला. त्यांच्यासाठी आणखी एक वादाचा मुद्दा असा होता की,सोने विनिमय मानकाने चलन जारी करणार्याच्या विवेकबुद्धीला पूर्णपणे अनियंत्रित सोडले आणि सरकारला बेलगाम अधिकार दिले.




महत्वाचे म्हणजे १८७१ पर्यंत प्रांत ही मुख्य प्रशासकीय एकके होती.परंतु,त्यांना महसुलासाठी केंद्रावर अवलंबून असताना केवळ त्यांच्या खर्चाचे नियोजन करण्याची परवानगी होती.यामुळे राज्याच्या वित्तव्यवस्थेत असंतुलन निर्माण झाले. ते वाढत्या आर्थिक ताणाला कारणीभूत ठरले. नंतर यावर उपाय म्हणून विविध प्रणाली विकसित करण्यात आल्या. परंतु, बाबासाहेबांनी नमूद केलेले मुद्दे महत्त्वाचे ठरले. त्यांचे सार्वजनिक वित्त क्षेत्रातील कार्य अग्रगण्य होते. त्यांच्या तपशीलवार आणि वस्तुनिष्ठ विश्लेषणाने केंद्र-राज्य आर्थिक संबंधांची अंतर्दृष्टी दिली. त्यांच्या अभ्यासाने केंद्र आणि राज्यांमधील आधुनिक संबंधांना आधारही दिला आहे. त्या काळात प्रचलित खोती प्रथा रद्द करण्यासाठी १९३७ मध्ये एक विधेयक मांडण्यातही बाबासाहेबांचा मोठा वाटा होता. या व्यवस्थेंतर्गत लोकांकडून कर वसूल करून सरकारकडे जमा करण्यासाठी इंग्रज मध्यस्थ नेमायचे. खोत नावाने ओळखले जाणारे हे मध्यस्थ सामान्य लोकांच्या शोषणाचे आणि अत्याचाराचे साधन होते. बाबासाहेबांनी सार्वजनिक निधीच्या खर्चासाठी तत्त्वे दिली होती. त्यांना 'आंबेडकरांचे सार्वजनिक खर्चाचे नियम' म्हणून ओळखले जाते.भांडवलाची कमतरता आणि जास्त श्रम हे तितकेच समस्याग्रस्त होते. त्यासाठी बाबासाहेबांनी सामूहिक शेती आणि औद्योगिकीकरण हे उपाय सुचवले.पूर्वीची उत्पादकता सुधारेल,तर नंतरची प्रच्छन्न बेरोजगारीची समस्या दूर करेल आणि भांडवलाचा साठा वाढवेल. डॉ.आंबेडकर यांच्याकडे जटिल समस्यांवर व्यावहारिक उपाय होते. त्यांनी नेहमीच लोकांचे कल्याण हे त्यांच्या धोरणांच्या केंद्रस्थानी ठेवले. त्यांनी संविधानसभेत कामगार कल्याणासाठी प्रयत्न केले. भारतीय संविधानातील मूलभूत अधिकारांच्या तत्त्वानुसार सकारात्मक आणि नकारात्मक दोन्ही अधिकारांचा समावेश करण्याचा विचारही त्यांनी पुढे आणला.

रिझर्व्ह बँकेची स्थापना......हिल्टन यंग कमिशननं त्यांच्या अहवालात केलेल्या सूचनांचा स्वीकार करुन तत्कालिन ब्रिटिश सरकारनं १९२७ मध्ये 'रिझर्व्ह बँक बिल' आणलं.या बँकेला बाजारात चलन जारी करण्याचे अधिकार होते आणि तिची स्वायतत्ता टिकवण्यासाठी तिच्या व्यवस्थापनावर राजकीय व्यक्तींच्या नेमणुका करता येणार नव्हत्या.पण अनेक मतमतांतरं असल्यानं हे विधेयक लगेच संमत झालं नाही. १९२८ मध्ये सुधारित विधेयक आणलं गेलं, पण तरीही बराच काळ वाद होत राहिला.१९३० मध्ये पहिल्या गोलमेज परिषदेमध्ये जेव्हा भारतातल्या राजकीय सुधारणांची आणि अधिकारांची चर्चा सुरु झाली, तेव्हा त्यात राजकीय अधिकारांबरोबर आर्थिक अधिकारांमध्ये केंद्रीय रिझर्व्ह बँकेची निर्मितीही पूरक मानली गेली.पुन्हा एकदा १९३३ मध्ये हिल्टन यंग कमिशनच्या शिफारशींवर आधारित 'द रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया बिल १९३३' हे आणलं गेलं आणि ६ मार्च १९३४ ते गव्हर्नर जनरलच्या सहीनं कायद्यात रुपांतरित झालं. त्यानुसार १ एप्रिल १९३५ रोजी 'रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया' अस्तित्वात आली.आज रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया स्थापन करण्याचे श्रेय भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रॉब्लेम ऑफ दि रुपी या ग्रंथा मुळेच झाली.

अखिल सर – ९६२३२७२८०४,तुमसर,भंडारा.
संचालक चझडउ क्गइ अकादमी,
मोटिवेटर, लेखक,संपादक, बिजनेस कोच

# सम्राट अशोक यांची जयंती धम्मबांधवांनी मोठ्या स्वरूपात साजरी करावी.

सम्राट अशोकाची जयंती चैत्र शुक्ल अष्टमीला असते.या जयंतीची तारीख दरवर्षी बदलत असते जसे बुद्ध पौर्णिमेची तारीख बदलते,जसे अशोक विजयादशमीची तारीख बदलते,तसेच सम्राट अशोकाच्या जयंतीची तारीख दरवर्षी बदलत असते कारण ही जयंती चैत्र शुक्ल अष्टमीला येते त्यामुळे आपण या वर्षी सुद्धा लक्षात ठेवून सम्राट अशोकाची जयंती मोठ्या स्वरूपात साजरी करूया.महान सम्राट अशोकाने या देशाला अशोकस्तंभ दिला.हा अशोकस्तंभ तथागत बुद्धांचे रूप आहे.आज हा अशोकस्तंभ भारताचे राष्ट्रीय प्रतीक आहे. त्यांनी निर्माण केलेले अशोकचक्र तिरंग्यावर मोठ्या दिमाखात झळकत आहे.सम्राट अशोकाच्या नावाने भारताचा सर्वोच्च शांतता काळातील शौर्य पुरस्कार दिला जातो.हा महान असा वारसा सम्राट अशोकांमुळे आपल्याला मिळाला.आपल्याला माहीतच आहे की दिनांक पाच एप्रिलला चैत्र शुक्ल अष्टमीच्या दिवशी सम्राट अशोक यांची जयंती येत आहे.या भारतभूमीचा महान भूमिपुत्र प्रियदर्शी चक्रवर्ती सम्राट अशोक यांचे या खंडप्राय भारतभुमीवर साम्राज्य होते.आजच्या भारताचे जे क्षेत्रफळ आहे याच्या दुप्पट भुभागावर सम्राट अशोकाचे राज्य होते.सम्राट अशोक यांनी मानवतेचा संदेश गावागावात पसरवला,मोठमोठे रस्ते महामार्ग बणवले,प्रवाशांना सावली मिळावी म्हणून रस्त्याच्या दुतर्फा झाडे लावली, विहिर, पानपोई,तलाव निर्माण केले,शासकीय विश्रामगृहाची निर्मिती सम्राट आशोकाचीच,रस्त्यावर किलोमीटरचे दगड प्रथमतः सम्राट आशोकानेच लावले.परकिय देशांसोबत चांगले व्यवहार केले.आजच्या परराष्ट्र धोरणावर सम्राट अशोकांचाच प्रभाव आहे.गाईंसहीत सर्व प्राणी व पक्षांना संरक्षण दिले,धम्माचा प्रचार प्रसार केला,स्वतःच्या मुलाला भिक्खू बनवले,स्वतःच्या मुलीला भिक्खुनी बनवले, हजारो स्तुपांची निर्मिती केली,अनेक विहारांची निर्मिती केली,अनेक स्तंभ बनवले, अनेक शिलालेख लिहिले,सांचीचा स्तूप,कल्हुआ स्तुप,बुद्धगयेचे महाबोधी विहार, सन्नतीचा स्तूप हे सगळे सम्राट अशोकानेच बनवले. अशा या महान भूमिपुत्राची जयंती येत आहे.आपण सम्राट अशोकाची जयंती मोठ्या थाटामाटा मध्ये साजरी करूया.

आपण सम्राट अशोकाची जयंती कशी साजरी केली पाहिजे.सर्वप्रथम आपण आपल्या विहारांमध्ये सम्राट अशोक यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करावे धम्मध्वजारोहन करावे. गावामधून,मोहल्या मधून, परिसरामधून रॅली काढावी.बौद्धमय भारताच्या संस्कृतीचे प्रदर्शन या रॅलीमध्ये करावे. रॅली काढत असताना सम्राट अशोक यांचा फोटो रथामध्ये सजवलेला असावा.सर्वजण पांढरे शुभ्र वस्त्र परिधान केलेले असावे, हातामध्ये पंचरंगी ध्वज असावेत,हातामध्ये फलक असावे या फलकावर तथागत गौतम बुद्ध, सम्राट अशोक, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे फोटो असावे,महेंद्र,संघमित्रा,जेम्स प्रिन्सेप,अलेक्झांडर कनिंघम, फाहियान,युआनत्सांग,इत्सिंग, अनागारिक धम्मपाल व अनेक बौद्ध धम्माला योगदान देणाऱ्या महामानवाचे फोटो असावेत.या फलकावर अशोक स्तंभ चिन्हांकित केलेला असावा,एखाद्या फलकावर बोधी वृक्षाचा फोटो असावा, एखाद्या फलकावर अशोक चक्र असावे,एखाद्या फलकावर सिंह असावा, एखाद्या फलकावर मोर असावा,एखाद्या फलकावर धम्मपदाचे वाक्य असावे,एखाद्या फलकावर त्रिपटकातील ग्रंथाचा फोटो असावा, एखाद्या फलकावर बुद्ध आणि त्यांचा धम्म ग्रंथाचा फोटो असावा, एखाद्या फलकावर दिक्षाभुमीचा फोटो असावा,एखाद्या फलकावर सांचीचा स्तूप असावा,एखाद्या फलकावर धम्मेक स्तुप,एखाद्या फलकावर महाबोधी महाविहार असावे,एखाद्या फलकावर सांचीगेट असावे,एखाद्या फलकावर कल्हुआ स्तुप असावा,एखाद्या फलकावर शिलालेखाचा फोटो असावा,एखाद्या फलकावर बुद्ध लेण्यांचा फोटो असावा.एखाद्या फलकावर धम्मसंगीतीचा फोटो असावा, सम्राट अशोक संबंधीत अनेक फोटो फलकावर असावेत आणि फलक हातात घेऊन आपण आपल्या मोहल्या मधून मिरवणूक काढावी.सम्राट अशोकांचा विजय असो, तथागत गौतम बुद्धांचा विजय असो,डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचा विजय असो, बौद्ध धम्माचा विजय असो,भिक्खू संघाचा विजय असो,अशा घोषणा द्याव्यात .बुद्धं सरणं गच्छामि,धम्मं सरणं गच्छामि, संघं सरणं गच्छामि अशा शांत मंजुळ आवाजात साऊंड बॉक्सवर रिंगटोन लावावे. अशाप्रकारे बौद्ध संस्कृतीची प्रदर्शनमय रॅली काढुन सम्राट अशोकाची जयंती चांगल्या प्रकारे साजरी करावी.मिरवणुकीचा समारंभ झाल्यावर विहारात येऊन सम्राट अशोकांना हार घालून आपण प्रवचनाचे आयोजन करावे,व्याख्यानाचे आयोजन करावे, भाषणाचे आयोजन करावे.या भाषणा मध्ये सम्राट अशोकाच्या जीवनावर त्यांनी केलेल्या महान कार्यावर माहिती देण्यात यावी.अशाप्रकारे बौद्ध संस्कृतीला अनुसरून विचारमय, समृद्धीमय, संस्कृतीमय,बौद्धमय,धम्ममय,सम्राट अशोकांची जयंती साजरी करावी.



*******
भंते धम्मानंद पुणे
मो. ८००७७८२५९६

## उन्हाळ्यात दुधाचा चहा बनवून पिण्यापेक्षा सोप्या पद्धतीने घरी बनवा नोट करून घ्या सिंपल रेसिपी



सकाळी उठल्यानंतर आपल्यातील अनेकांना दुधाचा किंवा काळा चहा पिण्याची सवय असते. या चहाचे सेवन केल्यामुळे झोप लगेच उडून जातो. सकाळी उठल्यानंतर उपाशी पोटी चहाचे सेवन केल्यामुळे शरीराची पचनक्रिया बिघडण्याची शक्यता असते. याशिवाय उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये अति चहाचे सेवन केल्यामुळे पचनसंबंधित समस्या उद्भवू लागतात. त्यामुळे उपाशी पोटी चहाचे सेवन करू नये. उन्हाळ्यात घरी आलेल्या पाहुण्यांचा पाहुणचार करताना त्यांना चहा दिला, जातो मात्र सतत चहा पिऊन कंटाळा आल्यानंतर काहींना काही नवीन पदार्थ खाण्याची किंवा पिण्याची इच्छा होते. त्यामुळे तुम्ही दुधाचा चहा बनवण्याऐवजी सोप्या पद्धतीमध्ये लेमन आईस टी बनवण्याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. या पद्धतीने चहा बनवल्यास चव अतिशय सुंदर लागेल.

साहित्य: चहाची पावडर लिंबू पुदिन्याची पाने पाणी बर्फाचे तुकडे
कृती: लेमन आईस टी बनवण्यसाठी सर्वप्रथम,टोपात पाणी घेऊन गॅस चालू करा. पाण्याला व्यवस्थित उकळी आल्यानंतर त्यात चहा पावडर टाका. चहा व्यवस्थित उकळल्यानंतर त्यात पुदिन्याची पाने बारीक कुसकरून टाका. चहा तयार झाल्यानंतर गॅस बंद करून घ्या. तयार केलेला चहा ग्लासात गाळून घ्या. काचेच्या ग्लासात बर्फाचे तुकडे टाकून गाळून घेतलेला चहा ओतून त्यात मध आणि लिंबाचा रस टाकून मिक्स करा. तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेला लेमन आईस टी. हा चहा उन्हाळ्यासाठी अतिशय उत्तम पर्याय आहे.

## तुम्हालाही जेवणात जास्त मीठ खाण्याची सवय आहे? डॉक्टरांनी सांगितला कर्करोगाचा धोका, जाणून घ्या रोज किती मीठ खाल्लं पाहिजे



मीठ आवश्यक असले तरी त्याचे हानिकारक परिणाम टाळण्यासाठी संयम राखणे महत्त्वाचे आहे. जास्त प्रमाणात सेवन केल्याने तात्काळ अस्वस्थता आणि दीर्घकालीन आरोग्याचे गंभीर धोके दोन्ही होऊ शकतात. जसे की, उच्च रक्तदाबापासून ते मूत्रपिंडाचे नुकसान आणि कर्करोगाचा धोका वाढणे. आरोग्यसेवा व्यावसायिकांशी सल्लामसलत केल्याने तुमच्या सोडियमच्या गरजा पूर्ण करणारा आहार तयार करण्यास मदत होऊ शकते आणि त्याचबरोबर तुमचे आरोग्यदेखील सुरक्षित राहू शकते. मीठ शरीरात द्रवपदार्थांचे संतुलन, स्नायूंचे कार्य आणि मज्ञातंतूंचे सिग्नलिंग नियंत्रित करण्यास मदत करून महत्त्वाची भूमिका बजावते. मात्र, त्याचे जास्त प्रमाणात सेवन केल्याने गंभीर आरोग्य धोके उद्भवू शकतात, ज्यामुळे दररोज प्रमाणात मिठाचे सेवन करणे फायदेशीर आहे. इंद्रप्रस्थ अपोलो हॉस्पिटल्सचे वरिष्ठ सल्लागार-अंतर्गत औषध डॉ. राकेश गुप्ता यांनी द इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना या संदर्भात सविस्तर माहिती दिली आहे.

आपण किती मीठ सेवन करावे?

जागतिक आरोग्य संघटनेच्या (थक्ज) मते, प्रौढांनी दररोज पाच ग्रॅमपेक्षा कमी मीठ सेवन केले पाहिजे, जे सुमारे २,००० मिलीग्रॅम सोडियम इतके आहे. दररोज १,५००-२,३०० मिलीग्रॅम सोडियम सेवन करण्याची ते शिफारस करतात. या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन केल्याने उच्च रक्तदाब, हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधी रोग आणि स्ट्रोक टाळण्यास मदत होते, जे जास्त मीठ सेवनाशी जवळून जोडलेले आहेत.

जास्त मीठ सेवनाचे परिणाम काय आहेत?

जेव्हा तुम्ही शिफारसीपेक्षा जास्त मीठ सेवन करता तेव्हा शरीरावर नेमका काय परिणाम होतो? तेव्हा फरीदाबाद येथील यथार्थ सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल्सच्या इंटरनल मेडिसिन आणि रूमेटोलॉजीचे संचालक डॉ. जयंत ठाकुरिया यांनी या संदर्भात सविस्तर माहिती दिली आहे.

तहान वाढणे : जास्त मीठ तुमच्या शरीरातील द्रवपदार्थांचे संतुलन बिघडवते, ज्यामुळे निर्जलीकरण होते आणि संतुलन पुनर्संचयित करण्यासाठी सारखी तहान लागते.

पाणी साठणे : तुमचे मूत्रपिंड सोडियम पातळी संतुलित करण्याचे काम करतात, ज्यामुळे द्रव साठणे आणि पोटफुगी होते. या जास्त द्रवामुळे शरीराच्या विविध भागांमध्ये सूज येऊ शकते. ब्लड प्रेशरमध्ये तात्पुरती वाढ : अतिरिक्त सोडियम तुमच्या रक्तप्रवाहात पाणी ओढते, ज्यामुळे रक्ताचे प्रमाण वाढते आणि परिणामी तुमचा रक्तदाब वाढतो.

दीर्घकालीन आरोग्य धोके कोणते आहेत?

डॉ. ठाकुरिया आणि गुप्ता दोघेही सहमत आहेत की, दीर्घकाळ जास्त मीठ सेवन केल्याने तुमच्या आरोग्यावर लक्षणीय परिणाम होऊ शकतो.

उच्च रक्तदाब : सतत जास्त मीठ सेवन केल्याने दीर्घकालीन उच्च रक्तदाब होऊ शकतो, जो हृदयरोग आणि स्ट्रोकसाठी एक प्रमुख कारण आहे. डॉ. राकेश गुप्ता यांनी अधोरेखित केले की, जास्त मिठाच्या सेवनानं हृदयावर परिणाम होऊ शकतो.

किडनीचे नुकसान : मिठाच्या जास्त सेवनानं मूत्रपिंडाचा आजार होऊ शकतो किंवा स्थिती आणखी बिघडू शकते.

हाडांचे आरोग्य : उच्च सोडियम पातळीमुळे कॅल्शियमची कमतरता निर्माण होऊ शकते आणि ऑस्टियोपोरोसिसचा धोका वाढतो.

पोटाच्या कर्करोगाचा वाढता धोका : अभ्यासकांनी असे म्हटले आहे की, जास्त मीठ असलेल्या आहारामुळे पोटाच्या अस्तरावर होणाऱ्या हानिकारक परिणामांमुळे पोटाचा कर्करोग होण्याचा धोका वाढतो. मीठ आवश्यक असले तरी त्याचे हानिकारक परिणाम टाळण्यासाठी संयम राखणे महत्त्वाचे आहे. मिठाचे जास्त प्रमाणात सेवन केल्याने तात्काळ अस्वस्थता आणि दीर्घकालीन आरोग्याचे गंभीर धोके दोन्ही होऊ शकतात, जसे की उच्च रक्तदाबापासून ते मूत्रपिंडाचे नुकसान आणि कर्करोगाचा धोका वाढणे. आरोग्यसेवा व्यावसायिकांशी सल्लामसलत केल्याने तुमच्या सोडियमच्या गरजा पूर्ण करणारा आहार तयार करण्यास मदत होऊ शकते आणि त्याचबरोबर तुमचे आरोग्यदेखील सुरक्षित राहू शकते.

## आतड्यांमधील जळजळ कमी करण्यासाठी दह्यात मिक्स करून खा 'हे' पदार्थ, विषारी घटक पडून जातील बाहेर



चुकीचा आहार, व्यायामाचा अभाव, पाण्याची कमतरता, आहारात सतत होणारे बदल, वाढलेला मानसिक तणाव इत्यादी अनेक गोष्टींचा परिणाम आरोग्यावर लगेच दिसून येतो. त्यामुळे आरोग्याची जास्त काळजी घेणे आवश्यक आहे. शरीरात वाढलेला मानसिक आणि शारीरिक तणाव आरोग्यासाठी अतिशय घातक आहे. त्यामुळे दैनंदिन आहारात शरीराला पचन होणाऱ्या पौष्टिक पदार्थांचे सेवन करणे आवश्यक आहे. मात्र अनेकदा शरीराची ऊर्जा कमी झाल्यानंतर किंवा आहारात झालेल्या बदलांमुळे पचनसंबंधित अनेक समस्या उद्भवू लागतात. गॅस, अपचन, बद्धकोष्ठता किंवा ॲसिडिटी इत्यादी अनेक समस्या उद्भवू लागतात. मानसिक आरोग्य बिघडल्यानंतर शरीरात अनेक बदल दिसून येतात.

शरीरात साचून राहिलेले विषारी घटक आरोग्यासाठी अतिशय घातक ठरतात. हे घटक शरीरामध्ये दीर्घकाळ साचून राहिल्यामुळे आरोग्याला हानी पोहचण्याची शक्यता असते. यामुळे आतड्यांचे सुद्धा आरोग्य बिघडते. त्यामुळे बिघडलेली पचनक्रिया आणि आतड्यांचे आरोग्य सुधरण्यासाठी आहारात दह्याचे सेवन करावे. दही खाल्यामुळे शरीराची पचनक्रिया सुधारते. यामध्ये असलेले घटक शरीराला आवश्यक पोषण देतात. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला आतड्यांच्या निरोगी आरोग्यासाठी दह्यात कोणते पदार्थ मिक्स करून खावे, याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत.

चुकीचा आहार: अनेकांना नेहमीच बाहेरचे तेलकट किंवा तिखट पदार्थ खाण्याची सवय असते. नेहमी नेहमी बाहेरचे जंक फूड खाल्यामुळे शरीराची पचनसंस्था बिघडते आणि पोटासंबंधित अनेक समस्या उद्भवू लागतात. बद्धकोष्ठता, गॅस, अपचन, आणि आम्लता इत्यादी समस्या उद्भवू लागल्यानंतर लोक डॉक्टरांच्या सल्ल्याने औषध उपचार करतात. मात्र असे न करता घरगुती उपाय करून आरोग्याची काळजी घ्यावी.

दह्यात मिक्स करा हे पदार्थ: केळी: आतड्यांचे कार्य सुधरण्यासाठी दह्यात केळ मिक्स करून खावं. यामुळे शरीराची बिघडलेली पचनक्रिया सुधारते आणि आरोग्याला अनेक फायदे होतात. केळी आणि दही मिक्स करून खाल्यामुळे पोट स्वच्छ होते आणि आतड्यांसंबंधित कोणतीही समस्या उद्भवत नाही.

दही: खाल्यामुळे शरीराला अनेक फायदे होतात. रोजच्या आहारात दह्याचे सेवन केल्यामुळे आरोग्याला अनेक फायदे होतात. यामध्ये असलेले प्रोबायोटिक्सयुक्त गुणधर्म आतड्याना आलेली सूज, पोटात होणारी जळजळ कमी करण्यासाठी प्रभावी ठरतात. मुळव्याधाचा त्रास असलेल्या लोकांनी आहारात दह्याचे सेवन करावे.

भाजलेल्या जिऱ्याची पावडर: शरीरात साचून राहिलेली विषारी घाण बाहेर काढून टाकण्यासाठी सकाळी उठल्यानंतर कोमट पाण्यात लिंबू पिळून त्यामध्ये जिऱ्याची पावडर टाकावी. या पाण्याचे उपाशी पोटी नियमित सेवन केल्यास शरीरातील सर्व घाण स्वच्छ होईल आणि आतड्यांसंबंधित कोणतीही समस्या उद्भवणार नाही. मुळव्याधापासून सुटका मिळवण्यासाठी जिऱ्याच्या पाण्याचे किंवा जिरं घालून बनवलेले ताक प्यावे.

# ग्रामीण पाणीपुरवठा उपविभागाच्या मनमानी कारभाराला ग्रामपंचायत अधिकारी व सरपंच झाले त्रस्त ग्रामीण पाणीपुरवठा उपविभागाच्या मनमानी कारभाराकडे वरिष्ठांचे दुर्लक्ष

सदर प्रकरणी गट विकास अधिकारी श्रीमती समृद्धी दिवाने यांच्याकडे चौकशी करण्यासाठी आमच्या प्रतिनिधींनी त्यांच्या मो.नं.९५०३०७९९८ या ब्रह्मणध्वनीवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांचा संपर्क होऊ शकला नाही.

ग्रामीण पाणीपुरवठा उपविभागीय अभियंता श्रीमती वंदना साळवे यांना सदर प्रकरणी चौकशी करण्यासाठी आमच्या प्रतिनिधी यांनी त्यांच्या मो.नं.९०६७९४८३९२ भ्रमणध्वनीवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी आमच्या प्रतिनिधीचा फोन घेतला नाही त्यामुळे त्यांचा संपर्क होऊ शकला नाही.

केज/प्रतिनीधी केज पंचायत समितीतील ग्रामीण पाणीपुरवठा उपविभागाच्या मनमानी कारभाराला ग्रामपंचायत अधिकारी व सरपंच त्रस्त झाले आहेत तर ग्रामीण पाणीपुरवठा उपविभागाच्या मनमानी कारभाराकडे वरिष्ठांचे दुर्लक्ष असल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे व तशी चर्चा लोकप्रतिनिधी व नागरिकांतून ऐकण्यास मिळत आहे. तालुक्यामध्ये जल जीवन मिशन अंतर्गत अनेक गावांमध्ये कामे झाली आहेत काही कामे अपूर्ण तर काही कामे बोगस असल्याच्या तक्रारी गट विकास अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाले आहेत व तसेच चर्चाही आहेत. याबाबतची सविस्तर माहिती अशी की,केज तालुक्यातील ग्रामीण भागातील लोकांची नाळ आसलेल्या पंचायत समितीचे गट विकास अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण भागामध्ये अनेक योजना राबवल्या जातात त्यापैकी ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग हे देखील पंचायत समिती कार्यालयामध्ये एक कार्यालय आहे या कार्यालयातील अधिकारी इतके निगरगट्ट बनलेले आहेत, पाणी पुरवठा योजनेची कामे पुर्ण होऊनही एम.बी. बनवण्यासाठी पावतीची मागणी करत आहेत,केज तालुक्यातील अनेक ग्रामपंचायत अधिकारी व सरपंचांनी सागुनही पावती असल्याशिवाय एम.बी.च बनवणार नाही आसे आडमुठे धोरण पंचायत समितीचे पाणीपुरवठा उपविभागाचे कनिष्ठ अभियंता आनंद चव्हाण अवलंबल्याने ग्रामपंचायत अधिकारी व सरपंच हे त्रस्त झाले आहेत सदर प्रकरणाकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तात्काळ लक्ष देण्याची गरज आहे. सतत या कार्यालयामध्ये संबंधित अधिकारी व सरपंच आणि ग्राम पंचायत अधिकारी यांच्यामध्ये भांडणे होतात वेळीच वरिष्ठ अधिकाऱ्याने लक्ष देण्याची गरज असल्याचे सरपंचातून बोलले जात आहे.



अनेक संतप्त सरपंच आदोलनाच्या पावित्र्यात आहेत तर मागील काही दिवसापूर्वी एका सरपंच पतीने पंचायत समिती कार्यालयामध्ये केलेल्या कामाचे बिल निघत नसल्यामुळे दोन वेळा आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला होता. सध्या अनेक सरपंच आत्मदहन करण्याच्या तयारीत असल्याच्या चर्चा देखील ऐकण्यास मिळत आहे. केज पंचायत समितीला पूर्ण वेळ गट विकास अधिकारी नसल्यामुळे या कार्यालयात कर्मचाऱ्यावर वरिष्ठांचा अंकुश राहिला नाही असेही बोलले जात आहे. ग्रामीण पाणीपुरवठा उपविभागीय अभियंता श्रीमती वंदना साळवे यांच्या विरोधात अनेक नागरिक व सरपंच यांनी गट विकास अधिकारी श्रीमती समृद्धी दिवाने यांच्याकडे लेखी व तोंडी तक्रारी केलेल्या आहेत. त्या तक्रारीच्या अनुषंगाने गटविकास अधिकारी श्रीमती समृद्धी दिवाने मॅडम यांनी श्रीमती वंदना साळवे यांच्या विरोधात वरिष्ठकार्यालयाशीपत्रव्यवहारकेलाआहे. परंतु वरिष्ठ कार्यालयाकडून श्रीमती वंदना साळवे यांच्या विरोधात केलेल्या तक्रारीच्या आधारे अद्यापही कसल्याच प्रकारची कारवाई करण्यात आली नाही असे सरपंच व नागरिकांकडून बोलले जात आहे. तालुक्याच्या ठिकाणी पंचायत समिती गटविकास अधिकारी हे प्रमुख असतात त्यांच्या देखरेखेखाली अनेक कार्यालयाचा कारभार चालत आहे व ते कामकाज पहात असतात परंतु ग्रामीण पाणीपुरवठा उपविभागीय अभियंता श्रीमती वंदना साळवे व त्यांचे सहकारी नागरिकांना व सरपंच यांना म्हणतात की, गट विकास अधिकारी हे आमचे वरिष्ठ नाहीत त्यांचा आणि माझ्या विभागाचा कसल्याच प्रकारचा संबंध येत नाही असे नागरिकांतून व सरपंच यांच्याकडून चर्चा ऐकण्यास मिळत आहे. दिनांक १ एप्रिल २०२५ रोजी ग्रामीण पाणीपुरवठा उपविभागामध्ये काही ग्रामपंचायत अधिकारी व सरपंच कामानिमित्त गेले असता त्या ठिकाणी कनिष्ठ अभियंता आनंद चव्हाण कार्यालयात होते सरपंच यांनी गावामध्ये केलेल्या कामाची बिले काढण्याची मागणी आनंद चव्हाण यांच्याकडे केले असता त्यांनी सरपंचांना सांगितले की, तुम्ही बिले सादर करा त्यानंतर तुमची बिले काढण्यात येईल. त्यानंतर काही ग्रामपंचायत अधिकारी व सरपंच यांनी ग्रामपंचायत अधिकारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष मधुकर शेळके यांना त्यांच्या दूरध्वनी वरून संपर्क साधून सदर कार्यालयात बोलले असता. कनिष्ठ अभियंता आनंद चव्हाण यांच्याशी ग्रामपंचायत अधिकारी मधुकर शेळके यांनी चर्चा केली व सरपंच यांनी त्यांच्या गावात केलेल्या कामाची प्रत्यक्षात जाऊन पाहणी करा व त्यांनी केलेल्या कामाची बिले त्यांना द्या असे म्हणाले असता कनिष्ठ अभियंता आनंद चव्हाण यांनी सरपंच व ग्रामपंचायत अधिकारी मधुकर शेळके यांना उडवा उडवीची उत्तरे देत तुम्हाला आमच्या कार्यालयास तुम्ही काम केलेले ची बिले सादर करावी लागणार आहेत या भूमिकेवर ठाम होते. यावेळी सरपंच व ग्रामपंचायत अधिकारी मधुकर शेळके यांनी सांगितले की, बिल मागण्याचा अधिकार तुम्हाला नाही आम्ही ग्रामपंचायत कार्यालय अंतर्गत काम केलेले नाही ते गुत्तेदारा मार्फत काम केलेले आहे ज्यावेळी आपण दुकानदाराला पैसे देऊ त्यानंतर तो दुकानदार आपल्याला बिल देईल. पुढे बोलताना शेळके म्हणाले की, आम्हाला बिल मागण्याचा तुम्हाला काही अधिकार नाही व ग्रामपंचायतचे ऑडिट करतेवेळी आम्ही संबंधित एडिटरला संबंधित कामाचे बिल देवू तुम्ही आमच्या ग्रामपंचायत अधिकारी व सरपंच यांना नाहक त्रास देऊ नका व तुम्ही आम्हाला शासन आदेश द्या असे म्हणाले असता त्यांना सदर अभियंता यांनी उत्तरे दिली. सतत ग्रामीण पाणीपुरवठा विभागांमध्ये त्यांचे अधिकारी व सरपंच आणि नागरिकांमध्ये शाब्दिक भांडणे होत आहेत परंतु याकडे वरिष्ठ कार्यालयाचे अधिकारी यांचे दुर्लक्ष असल्यामुळे अनेक सरपंच सदर अधिकाऱ्यामुळे त्रस्त झाले आहेत. बराच वेळ या कार्यालयामध्ये गोंधळ चालू होता गोंधळ चालू असल्यामुळे बघणाऱ्याची मोठी गर्दी जमली होती.

# गटविकास अधिकारी श्रीम. समृद्धी दिवाने यांच्या विनंतीवरून व पत्रकार बांधवांच्या मध्यस्थीने दशरथ चवरे यांनी आमरण उपोषण सोडले

## चौकशी समिती मार्फत सदर कामाची चौकशी करून आठ दिवसात कारवाई करण्याच्या लेखी आश्वासनानंतर उपोषण मागे

दशरथ चवरे यांच्या आमरण उपोषणास भीमशक्ती सामाजिक संघटनेचे मराठवाडा संघटक चंद्रकांत खरात सर यांनी भेट देऊन त्यांच्यासमित चर्चा केली व भीमशक्ती सामाजिक संघटनेचे केज तालुकाध्यक्ष अक्षय वाघमारे व अशोक सरवदे यांनी सदर उपोषणास भेट देऊन भीमशक्ती सामाजिक संघटना केज तालुक्याच्या वतीने त्यांच्या स्वाक्षरीचे पाठिंब्याचे पत्र देऊन पाठिंबा दर्शविला.



केज/प्रतिनिधी गटविकास अधिकारी श्रीम. समृद्धी दिवाने यांच्या विनंतीवरून व पत्रकार बांधवांच्या मध्यस्थीने दशरथ चवरे यांनी आमरण उपोषण सोडले आहे. यावेळी गट विकास अधिकारी श्रीमती समृद्धी दिवाने यांच्या तोंडी आदेशावरून ग्रामीण पाणीपुरवठा उपविभागीय अभियंता यांनी चौकशी समिती मार्फत सोनीजवळा येथील जलजीवन मिशन अंतर्गत चालू असलेल्या कामाची चौकशी करून आठ दिवसात कारवाई करण्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर दशरथ चवरे यांनी तात्पुरत्या स्वरूपात आमरण उपोषण मागे घेतले आहे. जर प्रशासनाने आठ दिवसात लेखी आश्वासनाप्रमाणे कारवाई केली नाही तर सध्या काम चालू असलेल्या जलजीवन योजनेच्या पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलन करण्यात येईल असा इशारा चवरे यांनी प्रशासनाला दिला आहे. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, केज तालुक्यातील सोनीजवळा येथे जलजीवन मिशन अंतर्गत पाईपलाईन व पाण्याच्या टाकीचे काम चालू आहे. सदर काम हे निकृष्ट दर्जाचे करण्यात येत आहे, सदर काम अंदाजपत्रकाप्रमाणे होणे गरजेचे असताना देखील सदरील कंपनी मनमानी करून बोगस काम करत आहे. या कामासाठी ४ कोटी १३ लाख रुपये एवढा निधी मंजूर असून देखील सदर यंत्रणा ही स्वतः च्या फायद्या करिता सदर काम निकृष्ट दर्जाचे करित आहे त्याकरिता त्या कामाची तात्काळ एक समिती गठीत करून चौकशी करण्यात यावी, संबंधित (कंपनीचे) कन्ट्रक्शनचे लायसन रद्द करण्यात यावे, जलजीवन अंतर्गत पिण्याच्या पाण्याच्या टाकीचे काम थांबवण्यात यावे, सदर काम हे अंदाजपत्रकाप्रमाणे होत नाही, सदरचे काम हे अंदाज पत्रकाप्रमाणे करण्यात यावे, सदर कामाची चौकशी होईपर्यंत तात्काळ काम थांबवून सदर कंपनीचे देयक अदा करू नये, जर सदर कामाची आपल्या स्तरावरून एक समिती गठीत करून चौकशी केले नाही तर दिनांक २ एप्रिल २०२५ रोजी पंचायत समिती कार्यालयासमोर आमरण उपोषण करणार आहे अशा आशयाचे लेखी निवेदन दशरथ चौरे यांनी दिनांक १९ मार्च २०२५ रोजी गट विकास अधिकारी पंचायत समिती केज यांच्यासहसंबंधित कार्यालयाला दिले होते. परंतु सदर तक्रारीच्या अनुषंगाने कसल्याच प्रकारची दखल न घेतल्यामुळे निवेदनात दिलेल्या इशारा प्रमाणे दशरथ चवरे हे दिनांक २ एप्रिल रोजी सकाळी पंचायत समिती कार्यालयाच्या प्रांगणामध्ये आमरण उपोषणास बसले होते. गट विकास अधिकारी श्रीमती समृद्धी दिवाने या पंचायत समिती कार्यालयात येत असताना त्यांना उपोषण चालू असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले असता त्यांनी तात्काळ कर्मचाऱ्यांना बोलावून उपोषणाची चौकशी केली. गटविकास अधिकारी यांनी चौकशी केली असता सदर उपोषण हे जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग,केज यांच्याशी निगडित असल्याचे समजल्यानंतर त्यांनी तात्काळ सदर विभागाचे अधिकारी कर्मचारी यांच्याशी संपर्क करून अधिकारी कर्मचारी यांना तोंडे आदेश देऊन सांगितले की, तात्काळ उपोषणाची दखल घेऊन उपोषणापासून दशरथ चवरे यांना परावृत्त करावे व सदर कामाची तात्काळ चौकशी करून संबंधित दोषीवर योग्य ती कारवाई करण्यात यावी. त्याचबरोबर सहाय्यक गट विकास अधिकारी अभिमान राठोड यांनीही सदर विभागाच्या अधिकारी यांना सूचना देऊन सदर उपोषणाची दखल घेण्याचे सांगितले होते. गटविकास अधिकारी समृद्धी दिवाने यांनी उपोषण स्थळी भेट देऊन दशरथ चवरे यांच्यासोबत चर्चा करून त्यांच्या तक्रारीचे निरसन करून त्यांना उपोषण सोडण्याची विनंती केली व पत्रकार बांधवांनी देखील यावेळी मध्यस्थी केली त्यामुळे दशरथ चवरे यांनी तात्पुरत्या स्वरूपात आमरण उपोषण मागे घेतले आहे. यावेळी पत्रकार रामदास तपसे, तात्या गवळी, वसंत सोनवणे, अशोक नागरगोजे, मुबाशीर खतीब, धनंजय कुलकर्णी, महादेव काळे, ड. निखिल बचुटे, रमेश इतापे, रंजीत घाडगे, शेख सत्तार (मौलाना) ग्रामीण पाणीपुरवठा उपविभागीय अभियंता श्रीमती वंदना साळवे, कनिष्ठ अभियंता आनंद चव्हाण, कनिष्ठ सहाय्यक व्यंकट शेरेकर इत्यादी उपस्थित होते.

भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे राज्य मध्यवर्ती समिती सदस्य भाई मोहन गुंड यांनी या उपोषणास भेट देऊन दशरथ चवरे यांच्याशी चर्चा करून गुंड यांनी लेखी पत्र देऊन उपोषणास जाहीर पाठिंबा दिला.

# खा.सोनवणे बैठक टाळून दिल्लीमध्ये : वक्फ सुधारणा विधायकावर मतदान

केज/प्रतिनिधी पालकमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत दि.२ एप्रील रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात विविध विकास कामाचा आढावा बैठक असल्याने खा.बजरंग सोनवणे हे दि.१ एप्रील रोजी रात्री दिल्लीहुन केजला आले होते. दि.२ रोजी संसदेत वक्फ सुधारणा विधेयकावर आजच मतदान होणार असल्याने ते बीड येथील बैठक टाळून तातडीने दिल्लीला वक्फ संशोधन विधेयकावर होणा-या मतदानात सहभागी होण्यासाठी रवाना झाले. खा.बजरंग सोनवणे वारंवार बीड जिल्ह्यातील विकासाचे आणि सामाजिक मुद्दे प्रभावीपणे संसदेत मांडत आहेत. खा.सोनवणे यांनी रेल्वे, शेती, आरोग्य आदि विषयावर जिल्ह्याचे गाऱ्हाणे केंद्रात मांडलेले आहे. त्यांनी मागणी केलेल्या अनेक मागण्या मंजूर केल्या आहेत. बीड जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये दि.२ रोजी उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अजित पवार यांच्या उपस्थितीत जिल्हा विकास कामांची आढावा बैठक आयोजीत केली होती. या बैठकीसाठी ते बीड येथे आलेही होते, मात्र, वक्फ सुधारणा विधेयकावर संध्याकाळी संसदेमध्ये मतदान होणार असल्याने, ही महत्त्वाची बैठक टाळून ते तातडीने दिल्लीला रवाना झाले. जिल्ह्यातील विकास कामांबाबतचे निवेदन पालकमंत्री ना. अजित पवार यांच्याकडे पाठविण्यात आल्याचे कळविण्यात आले आहे.



# नवीन बीडिओंसाठी लोकांना किती काळ वाट पहावी लागेल? रिक्त पद भरले, पण नवे बीडीओ अद्यापही आलेच नाहीत!

किनवट: शेख शौकत :-किनवट पंचायत समितीला गेल्या दोन वर्षांपासून कायमस्वरूपी बीडीओ नसल्याने प्रभारीराजवरच आजपर्यंत भागविण्यात आले. त्यामुळे कोणाचेही नियंत्रण नव्हते. मात्र, तब्बल दोन वर्षांनी गटविकास अधिकारी यांचे पद शासनाने भरले असून, नवे गटविकास अधिकारी म्हणून पी.ए. सिनारे यांची नियुक्ती ग्रामविकास विभागाने केली आहे. परंतु अद्यापही सिनारे हे किनवटला रुजूच झाले नाहीत. किनवट पंचायत समितीचे समितीचे गटविकास अधिकारी सुभाष धनवे हे सेवानिवृत्त झाल्याने अधिकारी हे पद रिक्तच होते. गटविकास आजपर्यंत अतिरिक्त पदभार देऊन पंचायत समितीचा कारभार पाहण्यात येत असतानाच पी.ए. सिनारे यांची बदली किनवट पंचायत समितीत करण्यात आली आहे. वेळेवर काम न झाल्यामुळे लोक खूप संतापले आहेत.आता नवे बीडीओ मिळणार असल्याने जिल्ह्याच्या ठिकाणी राहून रेल्वे वेळापत्रकानुसार अपडाऊन करणाऱ्या कर्मचाऱ्यांची गोची होणार आहे. परंतु नवे बीडीओ अद्याप किनवटला रुजूच झाले नसल्याने तरी बीडिओ नसताना, कर्मचाऱ्यांच्या मनमानी वर्तनावर नियंत्रण ठेवण्यासाठी अधिकार गरज असतो अशी नागरिकांमध्ये चर्चा सुरू आहे.




# ‘उष्णतेशी लढा’ विषयावर लातूर येथे राज्यातील पहिलीच कार्यशाळा

## रुफ वॉटर हार्वेस्टिंग’द्वारे पावसाचे जास्तीत जास्त पाणी जमिनीत मुरविणार

लातूर :- जिल्ह्यात उष्णतेचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे, या अनुषंगाने विचारमंथन करण्यासाठी लातूर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणमार्फत ‘उष्णतेशी लढा’ या विषयावरील कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जिल्हा नियोजन समिती सभागृहात झालेल्या या कार्यशाळेत विविध तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे म्हणाल्या की, लातूर जिल्ह्यातील उष्णतेचे प्रमाण कमी करण्यासाठी विविध उपाययोजना आखण्यात येतील. त्याची सुरुवात ‘रुफ वॉटर हार्वेस्टिंग’ उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करून केली जाईल. यासाठी ‘अमृतधारा अभियान’ हाती घेण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी यांनी सांगितले. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, पर्यावरण तज्ज्ञ अतुल देऊळगावकर यावेळी उपस्थित होते. तसेच नवी दिल्ली येथील सेंटर फॉर सायन्स अँड एन्व्हायर्नमेंटच्या शाश्वत अधिवास विभागाचे प्रमुख रजनीश सरीन, पुणे येथील ज्येष्ठ वास्तुविशारद अविनाश हावळ, सार्वजनिक आरोग्य चळवळीतील तज्ज्ञ डॉ. अनंत फडके यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थितांना मार्गदर्शन केले. वातावरणीय बदलामुळे उष्णतेच्या लाटा सारखे संकटे येत आहेत. त्यामुळे केवळ भौगोलिकच नाही, तर आर्थिक परिणामही दिसून येत आहेत. जवळपास ४० टक्के अर्थकारण हवामान बदलामुळे प्रभावित होत असल्याचा अंदाज वर्तविण्यात येत आहे. उष्णतेच्या लाटेमुळे जगभरात लाखो लोकांच्या आरोग्यावर दुष्परिणाम होत आहे. आपल्या जिल्ह्यातही काही प्रमाणात उष्णतेच्या लाटेची समस्या जाणवते आहे. आगामी काळात हे संकट अधिक तीव्र होवू नये, यासाठी लवकर उपाययोजना हाती घेणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने जिल्हा प्रशासनामार्फत आवश्यक पाऊल उचलेले जाईल. लातूर जिल्ह्याला ५० वर्षे पूर्ण होईपर्यंत म्हणजेच सन २०३२ पर्यंत वृक्ष लागवड आणि संवर्धनावर भर देवून ‘हरित लातूर’ ही संकल्पना प्रत्यक्ष आणण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी सांगितले. लातूर जिल्ह्यात पुढील दोन महिन्यात ‘अमृतधारा अभियान’ प्रभावीपणे राबवून ‘रुफ वॉटर हार्वेस्टिंग’साठी विविध कामे केली जातील. प्रत्येक शासकीय इमारतीसह खासगी इमारतींवरही ‘रुफ वॉटर हार्वेस्टिंग’ करण्यासाठी लोकसहभागातून हे अभियान राबविले जाईल. आगामी काळात पावसाचे जास्तीत जास्त पाणी जमिनीत मुराविण्याला प्राधान्य दिले जाईल, असे जिल्हाधिकारी म्हणाल्या. सर्व शासकीय अधिकारी, कर्मचारी यांनी आपले कार्यालय, आपले राहते घर येथे ‘रुफ वॉटर हार्वेस्टिंग’ करून या अभियानात सक्रीय सहभाग नोंदवावा. तसेच विहीर पुनर्भरण, वृक्ष लागवड आदी उपक्रमालाही गती द्यावी, असे त्यांनी सांगितले.

पर्यावरण संवर्धनासाठी उपाययोजना हाती घेणे गरजेचे : श्री. देऊळगावकर

गेल्या काही वर्षात वातावरणीय बदलांमुळे झालेल्या परिणामांचा सामना लातूर जिल्ह्यातील नागरिकांना करावा लागला आहे. आगामी काही वर्षात यापेक्षाही अधिक गंभीर संकटाला आपल्याला सामोरे जावे लागेल. त्यामुळे वेळीच सावध होवून पर्यावरण संवर्धनासाठी उपाययोजना हाती घेण्याची आवश्यकता आहे. सध्या मोठ्या प्रमाणात शहरांचे काँक्रीटीकरण होत आहे, वृक्षांची संख्या कमी झाल्याने शहरात अधिक उष्णता जाणवते. शहरातील इमारतींचे बांधकाम करताना काही छोटे-छोटे बदल केल्यास उष्णतेवर नियंत्रण मिळविणे शक्य आहे. बांधकामासाठी वापरले जाणाऱ्या विटा यासारखे साहित्य निवडताना त्याची उष्णता शोषून घेण्याची क्षमता पाहूनच बांधकामासाठी वापर करावा. तसेच शहरामध्ये वृक्ष लागवड, हिरवी उद्याने निर्माण करायला हवीत, असे ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ अतुल देऊळगावकर यांनी सांगितले.

उष्णतेची लाट रोखण्यासाठी पर्यावरणाच्या लढाईचे शिलेदार व्हा : श्री. सरीन

लातूर जिल्ह्यातील हवामा पाहिले, तर काही उपाययोजना प्रभावीपणे केल्यास जिल्ह्यातील उष्णतेचे प्रमाण कमी करता येणे शक्य आहे. त्यासाठी सर्व नागरिकांनी पर्यावरणाच्या लढाईचे शिलेदार होवून काम करावे, असे आवाहन नवी दिल्ली येथील सेंटर फॉर सायन्स अँड एन्व्हायर्नमेंटच्या शाश्वत अधिवास विभागाचे प्रमुख रजनीश सरीन म्हणाले. देशातील काही जिल्ह्यांमध्ये सध्या उष्णतेमुळे धोकादायक स्थिती निर्माण झाली आहे. लातूरला त्या दिशेने जाण्यापासून रोखण्यासाठी जलसंवर्धन व वृक्ष संवर्धनावर भर देण्याची गरज आहे. तसेच इमारतीचे बांधकाम करताना परिसरात वृक्ष लागवड, हवा खेळती राहावी यासाठी शहरामध्ये ‘कुलिंग मास्टर प्लान’ तयार करण्याची गरज आहे. यामध्ये वृक्ष लागवड, उद्याने याचे योग्य नियोजन करून शहरात जास्तीत जास्त वृक्ष लागवडीवर भर देण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

ग्रीन बिल्डींग संकल्पना अंमलात आणण्याची गरज : श्री. हावळ

हवामानातील बदलांचा दुष्परिणाम म्हणून यावर्षी उष्णतेची लाट दीर्घकाळ राहण्याचा अंदाज वर्तविला जात आहे. उष्णतेच्या लाटेवर नियंत्रण मिळविणे, तसेच आगामी काळात या संकटापासून सुटका करून घेण्यासाठी तातडीच्या उपाययोजना आणि दीर्घकालीन उपाययोजना अशा दोन प्रकारच्या उपाययोजना हाती घेणे आवश्यक असल्याचे पुणे येथील ज्येष्ठ वास्तुविशारद अविनाश हावळ यांनी सांगितले. तातडीने करावयाच्या उपाययोजनांमध्ये अस्तित्वात असलेल्या इमारतींच्या परिसरात वृक्ष लागवड, टेरेस गार्डन, सौरऊर्जा निर्मिती, बायोगॅसची निर्मिती व वापर, रुफ वॉटर हार्वेस्टिंग यासारख्या बाबींवर लक्ष द्यावे लागेल. तसेच दीर्घकालीन उपाययोजनांमध्ये नवीन इमारतीचे बांधकाम करताना ग्रीन बिल्डींग संकल्पना अंमलात आणणे, शहरातील हरित पट्टे विकसित करण्याचे नियोजन करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

सार्वजनिक आरोग्य चळवळीतील तज्ज्ञ डॉ. अनंत फडके यांनी उष्माघाताची कारणे, उष्माघात झाल्यानंतर घ्यावयाची खबरदारी आदी बाबींवर मार्गदर्शन केले. तसेच उष्माघातापासून बचावासाठी व्यापक प्रमाणात जनजागृती करावी, अशा परिस्थितीत काय खबरदारी घ्यावी, याबाबत नागरिकांना माहिती देणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी डॉ. साकिब उस्मानी यांनी केले.






# ’वक्फ’ विधेयकाला न्यायालयात आव्हान देणार : ’एआयएमपीएलबी’चा निर्धार

वक्फ (दुरुस्ती) विधेयक हा एक काळा कायदा आहे. हे विधेयक कनिष्ठ सभागृहाने मंजूर केला तर ते राज्यसभेत मांडले जाईल. आमची मालमत्ता हिसकावून घेण्यासाठी सुरु केलेला हा प्रयत्न आहे. हे स्वीकारता येईल का?, असा सवाल करत आम्ही पराभूत झालो आहोत असे समजू नका, आम्ही या विधेयकाला न्यायालयात आव्हान देणार आहोत, अशी माहिती ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड (एआयएमपीएलबी) चे प्रवक्ते डॉ. सय्यद कासिम रसूल इलियास यांनी आज (दि. २) पत्रकार परिषदेत दिली. कायदा मागे घेतल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही संयुक्त संसदीय समिती (जेपीसी) मध्ये चर्चेदरम्यान या विधेयकाला विरोध करण्यात आला होता. आपण लढाई हरलो आहोत असे गृहीत धरू नये. आपण नुकतीच सुरुवात केली आहे. हा देश वाचवण्याचा लढा आहे. प्रस्तावित कायदा भारताच्या रचनेलाच धोका निर्माण करतो. सर्व जागरूक नागरिकांना विधेयकाला विरोध करण्याचे आवाहन करत आम्ही न्यायालयात जाऊ. हा कायदा मागे घेतल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही, असा निर्धार एआयएमपीएलबीचे एमडी अदीब यांनी व्यक्त केला. शेतकऱ्यांच्या आंदोलनाप्रमाणे देशव्यापी निदर्शने करु आम्हाला देश वाचवायचा आहे म्हणून आम्ही हा लढा सुरू केला आहे. आम्ही शेतकऱ्यांप्रमाणेच देशभर आंदोलन करुन गरज पडल्यास रास्ता रोको करु आणि विधेयकाला विरोध करण्यासाठी सर्व शांततापूर्ण उपाययोजना करू, असे सांगत शेतकऱ्यांच्या आंदोलनाप्रमाणे देशव्यापी निदर्शने करण्याचा इशाराही एआयएमपीएलबीचे प्रवक्ते मोहम्मद अली मोहसीन यांनी दिले.ऑगस्ट २०२४मध्ये वक्फ (दुरुस्ती) विधेयक लोकसभेतसादर करण्यात आले होते. त्यानंतर ते संयुक्त संसदीय समितीकडे पाठविण्यात आले. फेब्रुवारी २०२५ मध्ये याचा अंतिम अहवाल सादर करण्यात आला. केंद्रीय वक्फ परिषद आणि वक्फ बोर्डांमध्ये गैर-मुस्लिम सदस्यांसाठी तरतूद समाविष्ट आहे. तसेच, वक्फ म्हणून ओळखली जाणारी कोणतीही सरकारी मालमत्ता वक्फ राहणार नाही आणि जिल्हाधिकाऱ्यांकडून त्यांची मालकी निश्चित केली जाणार आहे. दरम्यान, काँग्रेससह विरोधी पक्षांनी या कायद्याला विरोध केला आहे, असा दावा केला आहे की विधेयकाची तपासणी करण्यासाठी स्थापन केलेल्या पॅनेलने विरोधी खासदारांनी मांडलेल्या सूचनांचा विचार केला नाही. त्यांनी केंद्रावर विधेयक घाईघाईने मांडल्याचा आरोपही केला आहे.



PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE